LIVE MAHARASHTRA 24
महाराष्ट्राचे निर्भीड, निष्पक्ष आणि विश्वासार्ह डिजिटल वृत्तपत्र

गुरुवार, १९ नोव्हेंबर २०२६ • पान १/१

 महाराष्ट्र • मुख्य मथळा

एसटीच्या बसेस धूर ओकतायत, RTO प्रशासन गप्प का? सामान्यांच्या वाहनांना नियम, मग सरकारी बसेसना कोणती सूट? ग्रामीण जनतेच्या वाट्याला खटारा बसेसच का? मदन साबळेंचा संतप्त सवाल!



सातारा : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) काही बसेसमधून मोठ्या प्रमाणात काळा धूर बाहेर पडत असल्याचे चित्र सातारा शहरात दिसत आहे. या धुरामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक, पादचारी, दुचाकीस्वार आणि दुकानदारांना या धुराचा त्रास सहन करावा लागत आहे. काही बसेसच्या मागून जाताना धुराचे लोट थेट नागरिकांच्या चेहऱ्यावर येतात. मग सामान्य नागरिकांनी हा त्रास किती दिवस सहन करायचा?आज देशभरात वाढते वायुप्रदूषण ही गंभीर चिंतेची बाब बनली आहे. वायुप्रदूषणामुळे श्वसनाचे विकार, हृदयविकार आणि आरोग्याशी संबंधित गंभीर समस्या उद्भवू शकतात. विशेषतःलहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांवर त्याचा अधिक परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत एसटी बसेसमधून बाहेर पडणाऱ्या काळ्या धुराकडे दुर्लक्ष करणे योग्य आहे का?सामान्य माणसालाच नियमांचा धाक

 जलद वार्ता: मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक सह राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ताज्या घडामोडी थेट LIVE महाराष्ट्र २४ वर

आपत्कालीन हेल्पलाईन: पोलीस ११२ • रुग्णवाहिका १०८ • अग्निशामक १०१ • महिला हेल्पलाईन १०९१ • बाल १०९८